पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९४**

(सभावृत्तांत)

**दिनांक – २१/१०/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **२१/१०/२०२०** रोजी **दु.०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती.सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
५. मा.कलाटे राहुल तानाजी
६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७. मा.कदम शशिकांत गणपत
८. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
९. मा.संतोष बबन कांबळे
१०. मा.अभिषेक गोविंद बारणे
११. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार - अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.इंगळे, मा.चितळे, मा.झगडे – उप आयुक्त, मा.पाटील – शहर अभियंता, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.निकम, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.खांडेकर – सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.भोसले, मा.मोरे, मा.देशमुख, मा.वाघुंडे – कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.गोफणे– आरोग्य अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.चारटणकर, मा.दुरगुडे, मा.लोणकर, मा.खोत – उप आयुक्त मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.गट्टूवार, मा.घुबे, मा.टकले – कार्यकारी अभियंता हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३७) वॉल साईन पेंटींगचे कामाचे वाढीव रकमे बाबत.

विषय क्र.३८) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या विकास कामांच्या तरतुदीमध्ये अंतर्गत वर्गीकरण करून वाढ करणेबाबत. – मा.शशिकांत कदम, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३९) ड मुख्यालय सव २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकातील भांडवली व महसुली या लेखाशिर्षकातील विकास कामांच्या तरतुदीत वाढ/घट करणेबाबत. - मा.शशिकांत कदम, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४०) डी मार्ट, चिंचवड येथील सि.स.नं.४७४७ पै मधील मोकळी जागा वार्षिक भाडे कराराने देणेबाबत - मा.शशिकांत कदम, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४१) भोसरी सहलकेंद्र येथील पाण्याचे तळे मच्छीमारीसाठी चालविणेस देणेबाबत. - मा.शशिकांत कदम, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४२) सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पातील फ क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतूदीमध्ये वर्गीकरण करणेबाबत. - मा.शशिकांत कदम, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४३) पुणे महानगर परिवहन महामंडळ लिं. सेवकांना दिवाळी बोनस व सानुग्रह अनुदान देणेबाबत. - मा.शशिकांत कदम, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४४) महापालिका अधिकारी/ कर्मचारी यांना प्रथा बोनस तथा सानुग्रह अनुदान तसेच सातव्या वेतन आयोगाचा फरक अदा करणेबाबत. - मा.शशिकांत कदम, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४५) प्रभाग क्र.३० मधील कामांना वाढ/घट वर्गीकरण करणेबाबत.- मा.शशिकांत कदम, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४६) मे.प्रोटेक्शन पावर बाऊन्सर यांचेकडील कामास मुदतवाढ देणेबाबत – मा.पौर्णिमा सोनवणे, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४७) सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात नवीन विकास कामांचे वर्गीकरण – मा.अभिषेक बारणे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव

विषय क्र.४८) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२४३५ दि.२१/०३/२०१८ अन्वये फेटाळण्यात आलेल्या ठरावात बदल करणेबाबत - मा.शशिकांत कदम, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४९) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१९७६ दि.१७/०१/२०१८ अन्वये फेटाळण्यात आलेल्या ठरावात बदल करणेबाबत. – मा.शशिकांत कदम, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.५०) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१९७७ दि.१७/०१/२०१८ अन्वये फेटाळण्यात आलेल्या ठरावात बदल करणेबाबत. – मा.शशिकांत कदम, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

अ) दि.०७/१०/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१९२) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दि.१४/१०/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१९३) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७६२९ विषय क्रमांक – ०१

दिनांक – २१/१०/२०२० विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/३७८/२०२०, दि.०७/१०/२०२०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.3/45/2020-21 अन्वये सन २०२०-२१ साठी ब क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत तसेच अ क्षेत्रिय कार्यालयाकडील प्रभाग क्र.१९ तसेच ग क्षेत्रिय कार्यालयाकडील प्रभाग क्र.२१ इ. भागात टँकरने पाणीपुरवठा करणेकामी मे.फ्रेंडस वॉटर सप्लायर्स नि.र.रू.37,49,174/- (अक्षरी र.रु.सदोतीस लाख एकोणपन्न्स हजार एकशे चौ-याहत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.37,49,174/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.37,49,174/- पेक्षा 8% कमी म्हणजेच र.रु.34,49,240/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.34,49,240/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६३० विषय क्रमांक – ०२

दिनांक – २१/१०/२०२० विभाग – स्थापत्य बीआरटीएस

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/७१७/२०२०, दि.०७/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

औंध वाकड सांगवी रस्त्यावरील मुळा नदीवर अस्तित्वातील ८मी. रुंदीच्या पुलाशेजारी वाढीव २२ मी. रुंदीचा पुल बांधणेची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. सदर नवीन विस्तारीत पुलाला पिंपरी चिंचवड भागातील मुख्य रस्त्यास जोडण्यासाठी १०३ मी. लांबीचा अप्रोच रस्ता तयार करणे, अस्तित्वातील कल्वहर्ट व संरक्षण खात्याचे जागेस संरक्षण भिंत बांधणे ही पिंपरी

चिंचवड महानगरपालिकेच्या पुर्णपणे अखत्यारीत (Scope) कामे पुणे महानगरपालिकेमार्फत केली जावीत व त्यासाठी येणार खर्च पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत देणेत येईल असे चर्चेत ठरले आहे. त्याअनुषंगाने पुणे मनपा मार्फत पुर्वगणन पत्रकामध्ये वरील बाबी समाविष्ट करुन संपुर्ण कामाचे र.रु.२९.१४ कोटीचे पुर्वगणनपत्रक तयार करणेत आलेले आहे. यामध्ये अस्तित्वातील पुलाशेजारी नवीन पुल बांधणेकरीता १८.१८ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे व पुलाचे अप्रोचच्या पुढे पिंपरी चिंचवड भागातील मुख्य रस्त्या जोडण्यासाठीचे रस्त्याचे कामास १०.९६ कोटी इतका खर्च येत आहे.

1. पुलाशेजारी नवीन पुल बांधणेसाठीचा खर्च १८.१८ कोटी यापैकी ५०% खर्च दोन्ही महानगरपालिकांनी देण्याचे ठरले आहे. त्यानुसार ५०% र.रु.९.०९ कोटी व
2. पिंपरी चिंचवड बाजुचा अप्रोच रस्ता कल्व्हर्ट वकम्पाऊंड वॉलचा एकण खर्च १०.९६ कोटी येणार असुन तो संपुर्ण खर्च असे एकुण२०.०५ कोटी रुपयाची मागणी पुणे मनपाने केलेली आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड हद्दीवरील मुळा व पवना नदीवरील पुल बांधतांना दोन्ही मनपांनी ५०-५० टक्के खर्च विभागुन घ्यावयाचा आहे. तसेच हद्दीवरील नदीवर बांधवयाच्या नविन पुलासाठी एका पुलाचे काम पुणे मनपा व दुस-यापुलाचे काम पिंपरी चिंचवड मनपाने करावयाचे असे ठरलेले आहे. तसेच त्यानुषंगाने कस्पटेवस्ती येथील मुळनदीवरील पुलाचे काम पुणे मनपा मार्फत करणेत येत असुन त्या ५०% खर्च पिंपरी चिंचवड मनपाने पुणे मनपाकडे जमा केलेला आहे. तसेच दापोडी येथील हॅरीस पुलाला समांतर पुल बांधणेसाठी पिंपरी चिंचवड मनपाने निविदा काढुन काम केले आहे. व त्याचा ५०% खर्च पुणे मनपाने पिंपरी चिंचवड मनपाकडे जमा केलेला आहे. तसेच हद्दीवरील नदीवरील पुलाचे बांधकाम करताना मनपा क्षेत्रातील पुलाचे अनुषंगिक करावयाचे अतिरिक्त बांधकामाचा पुर्ण खर्च निविदा काढणा-या अथवा पुलाचे बांधकाम करणा-या महानगरपालिकेस द्यावयाचा आहे. सद्यस्थितीत सांगवी फाट्या जवळील अस्तित्वातील ८.० मी. रुंदीच्या पुलाला समांतर वाढीव २२.०० मी. रुंदीचा पुल बांधणेसाठी पुणे मनपाने त्याच धर्तीवर र.रु.९.०९ +१०.९६=२०.०५ कोटीची मागणी केली असुन सदरची मागणी योग्य असुन त्याप्रमाणे पुणे मनपास र.रु.९.०९ + १०.९६=२०.०५ कोटी अदा करणेस हरकत वाटत नाही. तरी सदरची र.रु.९.०९ +१०.९६=२०.०५ कोटी रक्कम पुलाचे बांधकामापोटी पुणे मनपास अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकुल - ११ प्रतिकुल - ०१

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६३१ विषय क्रमांक – ०३
दिनांक – २१/१०/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१८/कावि/१८७/२०२०, दि.२५/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मध्यवर्ती साहित्य भांडरामार्फत आण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील PMRD कोविड रुग्णालयास व ऑटोक्लस्टर येथे मनपाच्या DCH सेंटर यांनी दिलेल्या मागणीनुसार

कोरोना रुग्णांच्या उपचाराकरीता आवश्यक वैद्यकिय ऑक्सिजन गॅस $O_2$सिलेंडर १०० नग खरेदी करणेकामी मनपा अधिनियम कलम ६३ (६) व ६७(३)(क), आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय साथरोग अधिनियम १८९७ नुसार तात्काळ खरेदी करणेसाठी संबंधीत उत्पादित कंपनी/ त्यांचे अधिकृत विक्रेते, अथवा अधिकृत पुरवठादार यांनी अल्प मुदतीची जाहिर सुचना क्रंमाक १९/२०२०-२१ (Expression of Interest) नुसार लघुत्तम पुरवठाधारक में.संदेश इंड्रस्टीयल गॅस, पिंपरी यांचे प्रति नग र.रु.७,४६३.५ प्रमाणे एकुण र.रु.७,४६,३५०/- इतका खर्च अपेक्षित आहे. प्राप्त दर स्विकृत करुन में.संदेश इंड्रस्टीयल गॅस, पिंपरी पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेले आहेत. त्यानुसार वैद्यकिय ऑक्सिजन गॅस $O_2$ सिलेंडर १०० नग खरेदीकामी प्रति नग र.रु.७,४६३.५ प्रमाणे एकुण र.रु.७,४६,३५०/- खर्चास व संबंधीत पुरवठाधारकाशी कार्योत्तर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६३२ विषय क्रमांक – ०४

दिनांक – २१/१०/२०२० विभाग– वाहन दुरूस्ती कार्यशाळा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.काशा/१/कावि/२४९/२०२०, दि.१२/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारत सरकार तसेच राज्य शासनाने “कोरोना” विषाणु कोविड १९ प्रादुर्भाव रोखणेसाठी राज्यात साथरोग प्रितबंधात्मक कायदा १९८७ दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करुन अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ लागु करुन राष्ट्रीय आपत्ती घोषिक करुन “कोरोना” विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी युध्दपातळीवर कामकाज करणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कोविड १९ कामकाजासाठी पिंपरी चिंचवड मनपाचे रुग्णालये व कोविड केअर सेंटरला कोरोना संसर्ग बाधित रुग्णांना रुग्णालयांना/कोविड केअर सेंटरला ने-आण करणेसाठी व रुग्णालय व कोविड सेंटर यांचे वापराकरीता उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड यांचेमार्फत मे.बालाजी गॅरेज या एजन्सीकडुन टेम्पो/इनोव्हा/सुमो तत्सम प्रकारची वाहने उपलब्ध करुने देणेत आलेली आहेत. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे - परिचलन पध्दतीनुसार प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे पिंपरी चिंचवड व बारामती यांची संयुक्त बैठक क्र.४९ दि.१७/०५/२०२० नुसार भाडे दर

| अ.क्र | पुरवठादार / कालावधी | वाहन प्रकार | वाहनांची संख्या | प्रतिवाहन २४ तासाचे भाडे र.रु. | ३० दिवसासाठी खर्च र.रु. | ३ महीन्यासाठी एकुण खर्च र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.बालाजी गॅरेज | टेम्पो | २ | ३२६० | ९७,८०० | **५,८६,८००** |
| | | इनोव्हा/तत्सम | ५ | ४७१० | १,४१,३०० | **२१,१९,५००** |
| | | सुमो/तत्सम | १ | २९६० | ८,८८०० | **२,६६,४००** |
| | | | | **एकुण र.रु.** | | **२९,७२,७००/-** |

उपरोक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कोविड १९ कामकाजासाठी पिंपरी चिंचवड मनापचे रुग्णालये व कोविड केअर सेंटरला वापर करणेसाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडुन मे.बालाजी गॅरेज या व्यवस्थापन एजन्सीकडुन उपरोक्त वाहने उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत. तरी सदरकामी मे.बालाजी गॅरेज यांनी पुरवठा करणेत आलेल्या वाहनांना तीन महीने कालावधीकरीता एकुण अंदाजे रु.रु.२९,७२,७००/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख बाहत्तर हजार सातशे फक्त) एवढा खर्च येणे आपेक्षित आहे. तरी सदरच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६३३ विषय क्रमांक – ०५

दिनांक – २१/१०/२०२० विभाग– ह क्षेत्रिय कार्यालय

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता(वि) यांचे पत्र क्र.हक्षेका/लेखा/कावि/८०/२०२०, दि.०१/१०/२०२०

मा.कार्यकारी अभियंता(वि) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रीय कार्यालयाकडील विदयुत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (1 ते 14) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६३४ विषय क्रमांक – ०६

दिनांक – २१/१०/२०२० विभाग– अ क्षेत्रिय, विद्युत

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.अक्षे/वि/५/कावि/८२/२०२०, दि.२९/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

ऑटो क्लस्टर चे हॉल ए व हॉल बी कोरोना विषाणू आपत्कालीन उपाययोजना म्हणून अधिग्रहित करून सदर ठिकाणी कोविड हॉस्पिटलची उभारणी केली आहे. या ठिकाणी ऑक्सिजन व अतिदक्षता विभाग तयार करण्यात आलेले आहे. या हॉल ए व बी साठी अत्यावश्यक विद्युत व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच, अतिदक्षता विभागासाठी वातानुकूलन यंत्रणा उभारण्यात आलेली आहे.सदर ठिकाणी ऑटो क्लस्टर संस्थेकडून कडून विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे. ऑटो कल्स्टर संस्थेने सदर ठिकाणचे जुलै २०२० व ऑगस्ट २०२० महिन्याचे वीज देयक करण्याची विनंती केली आहे त्यानुसार एकूण बिलाची र.रु.२,९५,१८७/- (अक्षरी र.रु.दोन लाख पंच्याण्णव हजार एकशे सत्यांशी फक्त) र.रु.२,५०,१५८/- व GST र.रु.४५,०२९/- एवढी रक्कम व या पुढे सदर ठिकणावरील येणारे वीज देयके अदा करणेस विद्युत मुख्य कार्यालयाकडील स्ट्रीट लाईट बिले या लेखाशीर्षावरुन खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७६३५ विषय क्रमांक – ०७

दिनांक – २१/१०/२०२० विभाग– मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मभां/६/कावि/४२०/२०२०, दि.०९/१०/२०२०

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे विद्युत विभागासाठी आवश्यक विविध बॅलास्ट साहित्य खरेदीबाबत ई.नि.सू. क्र.16/2020-21 अन्वये सात निविदा प्राप्त झाल्या आहेत. यापैकी प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.ब्राईटशाईन असोसिएट्स यांचे बाब क्र.1 व 2 एकुण 02 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.13,19,000/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.13,93,500/- पेक्षा-5.35% ने कमी आहेत तसेच लघुत्तम निविदाधारक मे.शक्ती फिक्चर्स प्रा.लि. यांचे बाब क्र.3 एकुण 01 बाबी साहित्याचे दर एकुण र.रू.3,05,700/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.4,95,000/- पेक्षा -38.24% ने कमी आहेत. याप्रमाणे एकुण 1 ते 3 बाबी विविध बॅलास्ट साहित्याचे एकुण लघुत्तम दर र.रू.16,24,700/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.18,88,500/- (अक्षरी र.रू.अठरा लाख अठ्याऐंशी हजार पाचशे फक्त) पेक्षा -13.97% ने कमी असल्याने सदर दर स्विकृत करण्यात आलेले आहेत. यानुसार सदर लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर करारनामा करुन त्यांना पुरवठा आदेश निर्गत करणेची कार्यवाही करणेत आलेली असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६३६ विषय क्रमांक – ०८

दिनांक – २१/१०/२०२० विभाग– उद्यान

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४१०/२०२०, दि.०९/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक १ अन्वये मनपाचे 'अ' क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक १० मधील विविध उदयाने देखभाल व संरक्षण करणे (भाग-१) कामाबाबत मे.अथर्व स्वयं. सेवा सह. संस्था मर्या. या ठेकेदारांची निविदा र.रू.५५,९२,६००/- (अक्षरी र.रु.पंच्चावन्न लाख ब्याण्णव हजार सहाशें फक्त) पेक्षा -१२.००% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.४९,२१,४८८/- प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६३७ विषय क्रमांक – ०९

दिनांक – २१/१०/२०२० विभाग – उद्यान

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४११/२०२०, दि.०९/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक २ अन्वये मनपाचे 'अ' क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक १० मधील विविध उदयाने देखभाल व संरक्षण करणे (भाग-२) कामाबाबत मे.रयत फॅसिलिटी मॅनेंजमेंट सर्व्हिसेस प्रा.लिमी. या ठेकेदारांची निविदा र.रू.७४,५६,८००/- (अक्षरी र.रु.चौ-याहत्तर लाख छपन्न हजार आठशें फक्त) पेक्षा -१६.००% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.६२,६३,७१२/- प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६३८ विषय क्रमांक – १०

दिनांक – २१/१०/२०२० विभाग – उद्यान

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.उप आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४१२/२०२०, दि.०९/१०/२०२०

मा.उप आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक ३ अन्वये मनपाचे 'अ' क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक १० मधील विविध उदयाने देखभाल व संरक्षण करणे (भाग-३) कामाबाबत मे.ओम साई एंटरप्रायजेस या ठेकेदारांची निविदा र.रू.४३,०२,०००/- (अक्षरी र.रु.त्रेचाळीस लाख दोन हजार फक्त) पेक्षा -१२.००% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.३७,८५,७६०/- प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६३९ विषय क्रमांक – ११

दिनांक – २१/१०/२०२० विभाग – उद्यान

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४१३/२०२०, दि.०९/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१९-२० काम क्र.११ अन्वये मनपाचे 'क'

क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र.२ व ८ मधील विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणे कामाबाबत मे.मंगलमुर्ती स्वयं. सेवा. सह. संस्था या ठेकेदारांची निविदा र.रू.५५,९२,६००/-(अक्षरी र.रु.पंचावन्न लाख ब्याण्णव हजार सहाशे फक्त) पेक्षा -१४.००% कमी दराची निविदा मंजुर दराने २ वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.४८,०९,६३६/-प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी-शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन कामकरुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६४० | विषय क्रमांक – १२

दिनांक – २१/१०/२०२० | विभाग – उद्यान

सुचक – मा.झामाबाई बारणे | अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४१४/२०२०, दि.०९/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१९-२० काम क्र.१२ अन्वये मनपाचे ‘क’ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प उद्यान देखभाल व संरक्षण करणे कामाबाबत मे.शिवमुद्रा स्वयं. सेवा. सह. संस्था या ठेकेदारांची निविदा र.रू.६५,९६,४००/-(अक्षरी र.रु.पासष्ट लाख शहाण्णव हजार चारशें फक्त) पेक्षा-१६.००% कमी दराची निविदा मंजुर दराने २ वर्ष कालावधीसाठी येणाराखर्च र.रु.५५,४०,९७६/-प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी-शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन कामकरुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६४१ | विषय क्रमांक – १३

दिनांक – २१/१०/२०२० | विभाग – उद्यान

सुचक – मा.शितल शिंदे | अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४१५/२०२०, दि.०९/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक १४ अन्वये मनपाचे ‘ड’ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक २५ व २६ मधील विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणे कामाबाबत मे.कल्याण स्वयं.सेवा.सह.संस्था या ठेकेदारांची निविदा र.रू.४०,१५,२००/-(अक्षरी र.रु.चाळीस लाख पंधरा हजार दोनशें फक्त) पेक्षा -१९.००% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.३२,५२,३१२/- प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६४२ विषय क्रमांक – १४
दिनांक – २१/१०/२०२० विभाग – उद्यान
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४१६/२०२०, दि.०९/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक १५ अन्वये मनपाचे 'ई' क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक ५ व ७ मधील विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणे कामाबाबत मे.राम कृष्णा हरी सर्व्हिसेस या ठेकेदारांची निविदा र.रू.६७,९७,१६०/- (अक्षरी र.रु.सदुसष्ट लाख सत्याण्णव हजार एकशें साठ फक्त) पेक्षा -१०.००% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.६१,१७,४४४/- प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६४३ विषय क्रमांक – १५
दिनांक – २१/१०/२०२० विभाग – उद्यान
सुचक – मा.झामबाई बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४१७/२०२०, दि.०९/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक १७ अन्वये मनपाचे 'फ' क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक ११ व १३ मधील विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणे कामाबाबत मे.गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लिमी या ठेकेदारांची निविदा र.रू.५५,९२,६००/- (अक्षरी र.रु.पंच्चावन्न लाख ब्याण्णव हजार सहाशें फक्त) पेक्षा -१८.००% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.४५,८५,९३२/- (अक्षरी र.रु.पंचेचाळीस लाख पंच्याऐंशी हजार नऊशें बत्तीस फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६४४ विषय क्रमांक – १६
दिनांक – २१/१०/२०२० विभाग – उद्यान
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.उप आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४१८/२०२०, दि.०९/१०/२०२०

मा.उप आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१९-२० काम क्र.१८ अन्वये मनपाचे 'फ'

क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र.१३ मधील विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणे कामाबाबत मे.जनसेवा स्वयं. सेवा. सह. संस्था या ठेकेदारांची निविदा र.रू.४९,३२,९६०/-(अक्षरी र.रु. एकोणपन्नास लाख बत्तीस हजार नऊशें साठ फक्त) पेक्षा -१६.००% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.४१,४३,६८६/- प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६४५ विषय क्रमांक – १७

दिनांक – २१/१०/२०२० विभाग – उद्यान

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.उप आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४१९/२०२०, दि.०९/१०/२०२०

मा.उप आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक १९ अन्वये मनपाचे 'ग' क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक २१ मधील विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणे कामाबाबत मे.यशक असोसिएटस या ठेकेदारांची निविदा र.रू.४७,०३,५२०/- (अक्षरी र.रु.सत्तेचाळीस लाख तीन हजार पाचशें वीस फक्त) पेक्षा -२०.०८% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.३७,५९,०५३/-प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६४६ विषय क्रमांक – १८

दिनांक – २१/१०/२०२० विभाग – उद्यान

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४२०/२०२०, दि.०९/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक २१ अन्वये मनपाचे 'ह' क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र.२० मधील विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणे कामाबाबत मे.सदिच्छा कन्स्ट्रक्शंन या ठेकेदारांची निविदा र.रू.६७,३९,८००/-(अक्षरी र.रु.सदुसष्ट लाख एकोणचाळीस हजार आठशें फक्त) पेक्षा -१६.००% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.५६,६१,४३२/-प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७६४७ विषय क्रमांक – १९
दिनांक – २१/१०/२०२० विभाग – भूमि आणि जिंदगी
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भूजि/८/कावि/१४७/२०२०, दि.०९/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपा प्रशासकिय इमारतीच्या आवारात दि.२७/१०/१९८८ रोजीच्या करारानुसार बँक ऑफ बडौदा पि.सी.एम.सी. शाखा चालु करण्यांत आली आहे. तसे दि.०५/१२/२०१६ बँक ऑफ बडौदाचे एटीएम सेंटर सुरु करण्यांत आलेले दि.२५/५/२०१८ चे पत्रानुसार विषयांकित मनपा प्रशासकिय इमारतीच्या आवारातली कॅन्टीन इमारतीच्या तळ मजल्यालगत बँक ऑफ बडौदाचे एटीएम सेंटर क्षेत्रफळ १०x १० चौ.फुट. क्षेत्र हे भाड्याने देण्यात आलेल्या बँक ऑफ बडौदा एटीम सेंटरची मुदत डिसेंबर २०१६ मध्ये संपलेली आहे. तसेच बँक ऑफ बडौदा पहिल्यामजल्याचे क्षेत्रफळ १४४६ चौ.फुट. क्षेत्र भाडे मुदत ऑगस्ट २०२० संपलेली आहे, नगररचना विभागाकडील दि. ११/०८/२०२० च्या पत्रानुसार मुल्यांकन सन २०१९-२०२०व सन २०२०-२१ चे प्रचलित दराप्रमाणे र.रु.६०/- प्रती चौ.फुट एकुण भाडे र.रु ९२,७६०/- प्रतिमाहे नुसार, इतर करा व्यतिरिक्त प्राप्त झाले आहेत. बॅकेस भाड्याने देणेस मनपाचे अटी/ शर्ती नुसार मान्यता देणेत येत आहे.

इमारतीचे वर्णन-

G+1 ( तळ मजला + पहील्या मजला )
तळ मजला क्षेत्रफळ – सेंटर क्षेत्रपळ १०x १० चौ.फुट.
पहिला मजला - क्षेत्रपळ १४४६ चौ.फुट

सबब बँक ऑफ बडोदा यांचे कार्यालयास पि.चि.म.न.पा. नियम/अटी शर्ती नुसार मनपा प्रशासकिय इमारतीच्या आवारातील कॅन्टीन इमारतीच्या तळ मजल्यालगत मनपाची इमारत जागा भाड्याने वापरासाठी देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम७९(ब) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६४८ विषय क्रमांक – २०
दिनांक – २१/१०/२०२० विभाग – वाहन दुरूस्ती कार्य.
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.काशा/०१/कावि/२५०/२०२०, दि.१२/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारत सरकार तसेच राज्य शासनाने “कोरोना” विषाणु कोविड १९ प्रादुर्भाव रोखणेसाठी राज्यात साथरोग प्रितबंधात्मक कायदा १९८७ दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करुन अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ लागु करुन राष्ट्रीय आपत्ती घोषिक करुन “कोरोना” विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी युध्दपातळीवर कामकाज करणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिके करीता कोविड १९ या आजाराने मृत पावलेले रुग्ण व इतर आजाराने मृत पावलेले रुग्ण यांची विल्हेवाट लावणेकामी मनपाकडील शववाहीका अत्यंत कमी पडत असल्याने पुणे

महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड., स्वारगेट या संस्थेकडुन दोन शववाहीनी बसेसमध्ये वैद्यकीय विभागाने सुचविलेनुसार किरकोळ बदल करुन कोविड १९ चे कामकाज करणे करीता भाडेतत्वावर तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन घेणेत आलेल्या आहेत. पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड यांनी त्यांचेकडील पत्र क्र.पीएमपीएमएल/टीएम/९७६, दि.१३/०८/२०२० चे अन्वये शववाहीनीचे भाडे दर प्रति बस प्रति खेप र.रु.६००/- सर्व खर्चासह अदा करणेबाबत कळविले आहे. सदर शववाहीनी चे बिल प्रति महीना अदा करणेत येणार असुन, लॉगशिटवर ज्या रुग्णालयामार्फत शववाहीका वापर होईल त्या रुग्णलयामार्फत योग्य त्या (खेपांच्या नोंदी) नोंदी घेऊन प्रमाणित केलेनंतरच बिल अदायगी करणेत येणार आहे. उपरोक्त प्रमाणे पीएमपीएमएल कडुन घेणेत येणा-या शववाहीनी बसेसचे बिल प्रति बस प्रति खेप र.रु.६००/- (सर्व खर्चासह) या प्रमाणे बिल अदायगी करणे आवश्यक आहे. कोविड १९ कोरोना विषाणुचा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता भविष्यात अशा प्रकारच्या शववाहीनींची आवश्यकता भासल्यास याच दराने पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड, या संस्थेकडून वाहने उपलब्ध करुन घेणेत येतील. सदर उपलब्ध करुन देणेत आलेल्या शववाहीनीचे भाडेदर प्रति बस प्रति खेप र.रु.६००/- (अक्षरी र.रु.सहाशे फक्त) सर्व खर्चासह या प्रमाणे येणा-या प्रत्यक्ष खर्चास पीएमपीएमएल या संस्थेस अदा करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६४९ विषय क्रमांक – २१

दिनांक – २१/१०/२०२० विभाग – वाहन दुरूस्ती कार्य.

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(३) यांचे पत्र क्र.काशा/भां/कावि/७९/२०२०, दि.०७/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(३) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालकीची विविध विभागाकडील जुन्या/निकामी वाहनांची एकत्रितरित्या लिलाव पध्दतीने विक्री करणेकरीता ३ वेळा केलेल्या ई निविदा कार्यवाहीत अंतिमत: दोन निविदा प्राप्त झालेने सदर निविदा दि.१२/०८/२०२० रोजी सक्षम मान्यतेने उघडण्यात आली असता त्यामध्ये M/S.SYNISE TECHNOLOGIES LIMITED यांचे आर.टी.ओ.ने विहीत केलेल्या वाहनांच्या लिलावाच्या गोपनिय किंमतीनुसार प्रत्यक्ष लिलावात ठरणा-या वाहनांच्या विक्रीच्या किंमतीवर ०.९९% इतका सर्वात कमी लिलाव कमिशन दर प्राप्त झाला आहे. सदर दर स्विकृतीस व त्यानुसार दोन वर्ष कालावधी करीता करारनामा करणेस तसेच त्या दराने लिलावदाराचे येणारे कमिशन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६५० विषय क्रमांक – २२

दिनांक – २१/१०/२०२० विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/१३४/२०२०, दि.१३/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महागनरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकडील तालेरा आणि भोसरी रुग्णालयास आवश्यक असलेल्या डिस इंफेक्टंट जनरेशन सिस्टिम खरेदीकामी निविदा सूचना क्र.१०/२०१५-१६ अन्वये निविदा प्रसीध्द करणेत आली होती. त्यामध्ये मे.ओम एन्टरप्राईजेस यांचे लघुत्तम दर मा.आयुक्त यांचे कडुन स्विकृत करणेत आले होते त्या नंतर मे.ओम एन्टरप्राइजेस यांचे बरोबर दि.२८/०३/२०१६ रोजी करारनामा करणेत आलेला आहे. पुरवठा आदेश क्र.मसाभां/४/कावि/९०/२०१६ दि.०१/०४/२०१६ रोजी र.रु.२१,३६,०००/- चे आदेश देण्यात आलेले होते. करारनामा अट क्र.१ प्रमाणे करारनाम्याची मुदत १२ महीने तके राहील तसेच मुदत संपले नंतर देखभाल दुरुस्ती ३ वर्ष इतकी राहील. अट क्र. १० प्रमाणे १० लाख ते २५ लाखा पर्यंत उपकरणांची किंमत असलेल्या निविदेकरीता १ वर्ष हमी कालावधी संपलेनंतर ३ वर्षाच्या ए.एम.सी करीता ३% वार्षीक रक्कम अनुज्ञेय राहील असे नमुद आहे. अट क्र.११ मध्ये उपकरणे/साहीत्याचे ए.एम.सी.कालावधीमध्ये संबंधीत पुरवठा धारकाने दर ३ महीन्यातून एक वेळा त्या साहीत्य/ उपकरणाची तपासणी करणे बंधनकारक राहील तसेच स्वतंत्र हिस्ट्रीशिट मध्ये ए.एम.सी. बाबतचा संपूर्ण सविस्तर तपसिल नमुद करणे आवश्यक राहील असे नमुद आहे. पुरवठा आदेशाची र.रु.२१,३६,०००/- होती त्या प्रमाणे तीन वर्ष देखभाल दुरुस्तीसाठी खर्च एकूण र.रु.१,९२,२४०/- (अक्षरी र.रू.एक लाख ब्यान्नव हजार दोनशे चाळीस फक्त) एवढा खर्च येणार असल्याने देखभाल दुरुस्तीसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६५१ | विषय क्रमांक – २३
दिनांक – २१/१०/२०२० | विभाग – स्थापत्य ह मुख्यालय
सुचक – मा.शशिकांत कदम | अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/३२७/२०२०, दि.१३/१०/२०२०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.94/1/2019-20 अन्वये कासारवाडी भाजीमंडई विकसित करणेकामी मे.वैदेही कन्स्ट्रक्शन नि.र.रू.2,47,69,119/- (अक्षरी र.रु.दोन कोटी सत्तेचाळीस लाख एकोणसत्तर हजार एकशे एकोणीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.2,46,58,669/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.2,46,58,669/- पेक्षा 23.57% कमी म्हणजेच र.रु.1,88,46,621/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,08,942/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,10,450/- = एकुण र.रु.1,90,66,013/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७६५२ विषय क्रमांक – २४
दिनांक – २१/१०/२०२० विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/३२६/२०२०, दि.१३/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.74/1/2019-20 अन्वये प्रभाग क्र.८ येथील स्पाईन रोड येथील जय गणेश साम्राज्य चौक ते क्राती चौका पर्यंतच्या व इतर ठिकाणी रस्त्यावरील फुटपाथ कलर पेव्हींग ब्लॉक बसविणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामी मे.मैत्रेय कार्पोरेशन नि.र.रू.2,48,34,102/- (अक्षरी र.रु.दोन कोटी अठ्ठेचाळीस लाख चौतीस हजार एकशे दोन फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.2,40,25,058/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.2,40,25,058/- पेक्षा 24.24% कमी म्हणजेच र.रु.1,82,01,384/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.5,54,194/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.2,54,850/- = एकुण र.रु.1,90,10,428/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६५३ विषय क्रमांक – २५
दिनांक – २१/१०/२०२० विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पर्या/कावि/५/५०४/२०२०, दि.०७/०९/२०२०

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध कामांसाठी तांत्रिक सल्लगार समितीची (TAC) फी अंतर्गत झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.२५ चा विचार दि.२८/१०/२०२० चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६५४ विषय क्रमांक – २६
दिनांक – २१/१०/२०२० विभाग – स्थापत्य मुख्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/श.अ/तां/कावि/४/२३३/२०२०, दि.१४/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्थापत्य मुख्यालयामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकाअंतर्गत करण्यात येणारे रस्ते, पावसाळी पाण्यासाठी वाहिन्या व इतर स्थापत्य विषयक कांमे, पुल, स्कायवॉक इमारती यांचे प्रस्ताव तयार करण्याकरीता इच्छुक सल्लागारांच्या नियुक्ती करीता नि.नो.क्र.22/1/2017-18 अन्वये Expression of Interest ची निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यास अनुसरुन टप्पा-1 मध्ये एकुण 25 इच्छुक सल्लागारांना सहभागी करुन घेणेत आलेले आहे. टप्पा-2 मध्ये ॲस्ट्युट इन्फ्रास्ट्रक्चर प्रा .लि. सल्लागार यांनी विनंती अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केलेली आहे. ॲस्ट्युट इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. सल्लागार यांना नव्याने नियुक्त करणेकामी त्याच्या कामांच्या वर्गवारी प्रमाणे 1 ते 4 श्रेणी मध्ये प्रपत्र 'अ' (रस्ते, पावसाळी पाण्यासाठीच्या वाहिन्या व इतर स्थापत्य विषयक कामे – र.रु.50 कोटी वरिल कामे – सल्लागार श्रेणी – 4) व प्रपत्र 'ब' (पुल, स्कायवॉक व इमारती – रक्कम रु.50 कोटी वरिल कामे – सल्लागार श्रेणी – 4) याप्रमाणे प्रपत्र अ व ब तयार करणेत आलेले आहे. टप्पा - 2 मधील प्रपत्र अ व ब प्रमाणे ॲस्ट्युट इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. सल्लागार यांना पॅनेलवर घेणेसाठी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६५५ विषय क्रमांक – २७

दिनांक – २१/१०/२०२० विभाग – इ क्षेत्रिय, आरोग्य

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.इक्षेका/आ/४/कावि/६३८/२०२०, दि.१४/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे अंतर्गत इ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग ३, ४, ५ व ७ मधील औष्णिक धुरीकरण करण्यासाठी बॅन फॉग मशिन ठेवुन कामकाज करण्यासाठी आवश्यक डिझेलवर चालणारे तीन चाकी रिक्षा टेम्पो वाहनचालकसह भाड्याने घेणे या कामाची नि.नो.क्र.१/१-२०१९-२०२० अन्वये निविदा र.रु.८,१३,८००/- पेक्षा प्रति दिन प्रति रिक्षा र.रु.645/- कमी दराने प्राप्त झालेली आहे. एक वर्षाकालावधीसाठी प्रसिध्द करणेत आलेली आहे मे.श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांनी देण्यात आलेली मुदत दि.18/9/2019 ते 17/9/2020 अखेर होती सदर निविदा दिनांक 17/9/2020 रोजी संपुष्टात येत असल्याने निविदा क्र.3/2020-2021 तयार करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने वेळेत निविदा तयार होणार नसल्याने व कोरोना प्रादर्भाव रोखण्यासाठी कर्मचारी यांची नेमणुक करण्यात आलेली असुन त्यामुळे उक्त कामासाठी ३ महीने कालावधी अथवा नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत सदर कामास मुदत वाढ मिळणेकामी प्रस्ताव सादर करुन मा.सहा आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांनी दिनांक / /२०२० रोजी मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच मे.श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांची दिनांक 17/9/2020 अखेर होणा-या खर्चावर मान्यता संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे ठेकेदार यांना दि.18/9/2020 ते 17/12/2020 पर्यत मुदतवाढ 3 महीने कालावधी अथवा नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत र.रु.67,000/- (अक्षरी र.रू.सदोसष्ठ हजार फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास कार्यात्तर मान्यता देणेबाबत मा.अति.आयुक्त(२) यांची मागणी असली तरी प्रस्तुत कामाकरिता दरमहा

र.रू.६७,०८०/- इतका खर्च असल्याने ३ महिन्यासाठी र.रू.२,०१,२४०/- (अक्षरी र.रू.दोन लाख एक हजार दोनशे चाळीस फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६५६ विषय क्रमांक – २८

दिनांक – २१/१०/२०२० विभाग – स्थापत्य ड/ग

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/कावि/१६२/२०२०, दि.१४/१०/२०२०

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग ड/ग मुख्यालयाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (01 ते 08) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६५७ विषय क्रमांक – २९

दिनांक – २१/१०/२०२० विभाग – ह क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.हक्षेका/स्था/४१४/२०२०, दि.१४/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महापालिकेतील प्रभाग क्र.३२ सांगवी मधील PWD मैदानालगत असलेल्या आरक्षणात बॅडमिंटन हॉल, टेनिस कोर्ट इ. अस्तित्वात आहे. सदर ठिकाणी अत्याधुनिक पध्दतीने सिंथेटिक टेनिस कोर्ट विकसित करणे करिता तसेच इतर स्थापत्य विषयक कामांचे नियोजन करून संपूर्ण परिसर विकसित करणेकरिता मा.नगरसदस्य व क्रिडा विभाग यांची मागणी आहे. सबब सदर कामास सल्लागार म्हणून शशि प्रभू अँण्ड असोसिएट्स यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर कामांसाठी सल्लागार म्हणुन करावयाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये प्रस्तुत कामांचे पुर्वगणक पत्र तयार करणे व निविदा बनविणे तसेच कामांवर देखरेख करणे इ. निविदापुर्व (Pre tender activity) व निविदा पश्र्चात (post tender activity) कामे करावी लागणार आहेत. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत वास्तुविशारद /सल्लागार यांची दर सुची दि.२९/०५/२०१९ रोजी मागविण्यात आल्या सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्याप्रमाणे मे.शशि प्रभू अँण्ड असोसिएट्स यांनी २.००% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध प्रकल्पासाठी सल्लागार म्हणुन मे.शशि प्रभू अँण्ड असोसिएट्स यांची नियुक्ती केलेली आहे. मे.शशि प्रभू अँण्ड असोसिएट्स यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे यशस्वी रित्या पुर्ण केलेली आहे व सध्या देखील चालू आहेत. मे शशि प्रभू अँण्ड असोसिएट्स यांना मनपाच्या क्रं. सीए/ कावि/१५८/२०१९ व दि.१२/०२/२०१९ अन्वये केलेल्या Empanelment मध्ये मे.शशि प्रभू अँण्ड असोसिएट्स यांचा समावेश आहे. तसेच मा.आयुक्त यांनी सदर नेमणूकीबाबत दि.२१/०६/२०१९ च्या प्रस्तावाद्वारे मंजूरी देण्यात आलेली आहे.

उपरोक्त बाबीचा विचार करता मे.शशि प्रभू अँण्ड असोसिएट्सयांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्र्चात १.५०% (post tender activity) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प खर्चाच्या २.००% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६५८ विषय क्रमांक – ३०

दिनांक – २१/१०/२०२० विभाग – ह क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.स्था/हक्षे/कावि/३७४/२०२०, दि.२९/०९/२०२०

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिं.चिं.मनपाच्या ह क्षेत्रीय स्थापत्य विभागांतर्गत कार्यक्षेत्रात वरीलप्रमाणे काम करणेचे नियोजन आहे. सदर कामातून कोरोना बाधित क्षेत्र प्रतिबंधीत करणेकामी मंडप व्यवस्था करणे व इतर अनुषंगिक आवश्यक कामे करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कोरोना कोव्हिड–१९ चे रूग्ण संख्या झपाट्याने वाढत आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र. ३२ हद्दीत नवी सांगवीचा काही भाग व जुनी सांगवी इत्यादीचा भाग येत आहे. सदर भागात प्रशासनाकडून ज्या भागात रूग्ण सापडत आहेत त्या भागाचे सीमा प्रतिबंधीत करणे, पोलीसांना पहारा देणेसाठी व बंदोबस्तासाठी मंडप टाकणे, प्रतिबंधीत क्षेत्र फ्लेक्स लावणे, त्याभागातील दुकानांना सम-विषम तारखेचे बोर्ड तयार करणे इत्यादी कामे दररोज करावी लागत आहेत. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत ठेकेदार यांची नेमणूक करणेकरीता मा.अति. आयुक्त-२ यांच्या दि.०४/०९/२०२० च्या मंजुर प्रस्तावानुसार व सुचनेनुसार दरसूची दि.०७/०९/२०२० ते दि.१४/०९/२०२० दरम्यान र.रू.२,९९,०००/- यावर कोटेशन मागविण्यात आले आहेत. त्यानुसार मे.लालदिप कन्स्ट्रक्शन यांचेकडून १.५९% कमी इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र.३२ हद्दीत नवी सांगवीचा काही भाग व जुनी सांगवी इत्यादीचा भाग येत आहे. सदर भागात प्रशासनाकडून ज्या भागात रूग्ण सापडत आहेत त्या भागाचे सीमा प्रतिबंधीत करणे, पोलीसांना पहारा देणेसाठी व बंदोबस्तासाठी मंडप टाकणे, प्रतिबंधीत क्षेत्र फ्लेक्स लावणे, त्याभागातील दुकानांना सम-विषम तारखेचे बोर्ड तयार करणे ही परिणामकारक दैनंदिन कामे होणे करिता सदर कामासाठी ठेकेदारनेमणे अत्यंत आवश्यक आहे. मे.लालदिप कन्स्ट्रक्शन यांची ठेकेदार म्हणून कामाकरीता यांची नेमणूक करणेत यावी असे मत आहे . त्यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे केलेली आहेत व सध्या काही कामे प्रगती पथावर आहेत त्यांनी मनपाला आत्तापर्यंत वेळोवेळी आवश्यक मागणीनुसार सेवा दिलेली आहे. सबब, त्याकामी मे.लालदिप कन्स्ट्रक्शन यांची नेमणुक करुन त्याकरीता (१.५९% कमी) एवढा दर प्राप्त झालेला आहे. तरी प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरीता एकूण कामाच्या रक्कमे पैकी १.५९% कमी या दराने रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७६५९ विषय क्रमांक – ३१
दिनांक – २१/१०/२०२० विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.पापु/८/कावि/५७६/२०२०, दि.२३/०९/२०२०

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र "अ" (०१ ते ०८) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६६० विषय क्रमांक – ३२
दिनांक – २१/१०/२०२० विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.पापु/८/कावि/६०५/२०२०, दि.०७/१०/२०२०

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र "अ" (०१ ते ०२) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६६१ विषय क्रमांक – ३३
दिनांक – २१/१०/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१८/कावि/२५०/२०२०, दि.१४/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील PMRD Covid Hospital यांनी दिलेल्या मागणीनुसार नव्याने वैद्यकिय ऑक्सिजन $O_2$ द्रव गॅसचा पुरवठा करणेकामी कोटेशन/ निविदा/ जाहिर सुचना द्वारे वितरक नेमणुक होईपर्यंत मा. आयुक्त सो. आणि मा.

